# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस क्रं. ग्रागानिमं/नाशप/०५७ /२००९

अर्जदार : श्री सिरजउदीन एम. सिद्दिकी
घर क्रं. 324, W.C.L. घोटुर्ली वायगाव
तहसील उमरेड,
जिल्हा. नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता, विभाग क्रं. 1,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती : 1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्री एस.एफ.लांजेवार
कार्यकारी अभियंता तथा
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

3) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

–– आदेश ––

पारीत दि. ०५.१२.२००९

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी तक्रार अर्ज दिनांक १४.१०.२००९ रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम 6.4 विनियम 2006 प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराच्या गा–हाण्याचा तपशील :–

सदर तक्रार अर्ज कर्त्याने १४.१०.२००९ रोजी दाखल केलेली आहे त्यांचे म्हणणे असे आहे की विद्युत पुरवठा जोडणीच्या सर्व औपचारीकता पुर्ण केल्यानंतरही त्यांना विद्युत पुरवठा देण्यात आला नाही. त्यांना त्वरीत विज पुरवठा देवून दोषी व्यक्तीला दंड देण्यात यावा अशी प्रार्थना केली आहे.

अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्षात दिनांक ३०.०९.२००९ रोजी तक्रार केली होती. परंतु तक्रारीचे निवारण झालेले नाही.

गैरअर्जदाराने त्यांचे लिखीत म्हणणे दि. २९.१०.२००९ ला सादर केलेले आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की सदर विद्युत पुरवठयाला सरपंच ग्रामपंचायत वायगाव यांनी हरकत घेतली त्यामुळे आधी दिलेली परवानगी रद्द केल्यामुळे ग्राहकाला विद्युत पुरवठा देण्यात आला नाही. त्यांनतर दि. १५.१०.२००९ ला अर्जदारास विद्युत पुरवठा देण्यास हरकत नसल्याचे पत्र सादर केले त्यामुळे दिनांक २३.१०.२००९ रोजी विद्युत पुरवठा देण्यात आला आहे.

गैरअर्जदाराचे म्हणण्यानुसार अर्जदाराच्या तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे त्यामुळे कोणत्याही कार्यवाहीची आवश्यकता नाही.

मंचाने दोन्ही पक्षकाराचे म्हणणे एकुण घेतले.

अर्जदाराने दिनांक १४.०५.२००९ रोजी डिंमाड प्रमाणे पैसे भरलेले होते, तसेच ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले होते. त्यानंतरही अर्जदारास विद्युत पुरवठा करण्यात आला नाही.

गैरअर्जदाराने आपल्या म्हणण्याला दुजो–याकरिता काही कागदपत्र दाखल केलेले आहेत त्यात दाखल करण्यात आलेले नाहरकत प्रमाणपत्र रद्द करण्याकरिता दिलेले दिनांक ११.०५.२००९ चे पत्र नंतर तयार केलेले वाटते.

अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरून सदर पत्र विश्वासहार्य वाटत नाही. ग्रामपंचायतने ०९.०४.२००९ रोजी दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्राचा विचार करून त्वरीत कारवाई करावयास हवी होती.

गैरअर्जदाराने दिलेले स्पष्टीकरण समाधानकारक वाटत नाही. यावरुन मंचाचे असे मत झाले आहे की ग्राहकास वीज जोडणी देण्यास निश्चितपणे विलंब झाला आहे.

तक्रार कर्त्याने दि. १७.०५.२००९ रोजी पैसे भरुन टेस्ट रिपोर्ट गैरअर्जदाराच्या कार्यालयास सादर केला होता. त्या दिवसापासून 30 दिवसांच्या आत विजपुरवठा देणे गैरअर्जदारावर बंधनकारक होते. परंतु तसे न झाल्यामुळे तक्रारकर्ता हा (SOP Regulations) कृती ची मानके प्रमाणे भरपाई मागण्यास पात्र आहे.

तक्रारकर्त्याला दि. ३०.१०.२००९ रोजी विज पुरवठा देण्यात आलेला आहे. गैरअर्जदाराने असे म्हटले आहे की, दि. १७.१०.२००९ रोजी कर्मचा–यास पाठविले असता अर्जदाराचे शेजा–यांनी अडथळा निर्माण केला त्यामुळे दि. २३.१०.२००९ रोजी दुस–या पोलवरुन विद्युत पुरवठा देण्यात आला. गैरअर्जदाराने दि. १७.१०.२००९ रोजी विज पुरवठा देण्याकरीता कार्यवाही केली त्यानंतर झालेल्या विलंबास गैरअर्जदारास दोषी

ठरविता येत नाही. अर्जदार हा दि. १७.०६.२००९ रोजी ते दि. १७.१०.२००९ पर्यंत या कामाकरीता कृती च्या मानके अधिनियम प्रमाणे भरपाई मागण्यास पात्र आहे.

जरी तक्रार कर्त्यास विद्युत पुरवठा दिलेली आहे तरी देखील (SOP) कृती ची मानके प्रमाणे भरपाई देण्याची जबाबदारी गैरअर्जदारावर येते.

मंचापुढे दोन्ही पक्षांनी सादर केलेली कागदपत्रे, पुरावे तपासले आणि दोन्ही पक्षांचे लिखित व तोंडी म्हणणे ऐकुन घेवून मंचानी दोन्ही बाजुचा विचार करून खालील निर्णय घेतला.

## निर्णय

मंच अशा निष्कर्षास पोहचला आहे की, गैरअर्जदार हा कृती मानकाप्रमाणे अर्जदारास दि. १७.०६.२००९ ते १७.१०.२००९ हया कालावधी करिता विद्युत पुरवठा विलंबाकरिता भरपाई देण्यास बाध्य आहे.

सदर तक्रार अर्ज मंजूर करण्यांत येत आहे.

गैरअर्जदाराला आदेश देण्यात येत आहे की दि. १७.०६.२००९ ते १७.१०.२००९, ४ महीने या कालावधी करीता अर्जदारास देय भरपाई कृतीमानके प्रमाणे दयावी. व कार्यवाही बाबतचा पुर्तता अहवाल हया मंचास 30 दिवसांचे आत कळवावा.

| सही / – | सही / – | सही / – |
|---|---|---|
| (एस.एफ. लांजेवार) | (श्रीमती गौरी चंद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या | सभापती |

ग्राहक गा–हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,

नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.